बुधवार दि. १५ जुलै २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३१४ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जीवनदृष्टा हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# महापालिकेची सर्वसाधारण सभा गाजली

## भीम पार्क-विपश्यना केंद्रावरून प्रचंड गोंधळ, पाच तास चाललेल्या सभेत दहा मिनिटांचा तहकूब

**स्वच्छता, पाणीपुरवठा, पीआर कार्ड, अतिक्रमण, जीएसटी अनुदान, मोकाट जनावरे, पिंक टॉयलेटपासून मनपा कार्यालयातील शिस्तीपर्यंत विविध प्रश्नांवर जोरदार चर्चा; अनेक विषय मंजूर... मंजूर... म्हणत मार्गी**

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मंगळवारी (दि. १४) भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी सभागृहात महापौरांच्या अध्यक्षतेखाली तब्बल पाच तासांहून अधिक काळ चालली. सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील सदस्यांमध्ये विविध विषयांवर जोरदार शाब्दिक चकमक झाली. विशेषतः भीम पार्क व विपश्यना केंद्राचा विषय विषयपत्रिकेत न घेतल्याच्या मुद्द्यावर शिवसेना (शिंदे गट) आणि भाजपचे नगरसेवक आमनेसामने आल्याने सभागृहात मोठा गोंधळ निर्माण झाला. एका नगरसेवकाने संतापाच्या भरात माईक फेकून दिल्याने वातावरण अधिकच तापले आणि अखेर महापौरांना सभा दहा मिनिटांसाठी तहकूब करावी लागली. त्यानंतर पुढील सर्वसाधारण सभेत भीम पार्कचा विषय घेण्याचे आश्वासन दिल्यानंतर वातावरण निवळले आणि सभा पुन्हा सुरू झाली.

**सुरुवातीलाच नियमांवरून विरोधक आक्रमक**

सभा सुरू होण्यापूर्वी वंदे मातरमनंतर महाराष्ट्र गीत घेणे राहून गेल्याची बाब विरोधी पक्षनेते विरेंद्रप्रकाश धोका यांनी निदर्शनास आणून दिली. त्यानंतर महाराष्ट्र गीत घेण्यात आले.

सभेच्या प्रारंभी महापौरांनी सभागृहाच्या कामकाजासाठी काही नियम जाहीर केले. प्रत्येक विषयावर सत्ताधारी पक्षाचे दोन आणि विरोधी पक्षाचा एक सदस्य बोलेल, एक सदस्य बोलत असताना दुसऱ्याने बोलू नये, अधिकारी-कर्मचाऱ्यांचे नाव न घेता पदाचा उल्लेख करावा तसेच न्यायप्रविष्ट प्रकरणांवर चर्चा टाळावी, अशा सूचना देण्यात आल्या.

मात्र या नियमांना अपक्ष नगरसेवक श्रीकांत पांगारकर यांनी तीव्र आक्षेप घेत विरोधी पक्षाचा आवाज दाबण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप केला. यावर उपमहापौर राजेश राऊत यांनी सभागृहाचे संचालन करण्याचा अधिकार महापौरांना असल्याचे स्पष्ट केले. त्यानंतर प्रत्येक सदस्याला बोलण्याची संधी दिली जाईल, असे आश्वासन देण्यात आल्यावर हा वाद निवळला.

**पीआर कार्डचा मुद्दा**

नगरसेविका अ‍ॅड. रिमा खरात यांनी झोपडपट्टीधारकांना पीआर कार्ड देण्यास होत असलेल्या विलंबाचा प्रश्न उपस्थित केला. ज्या भागांचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे, त्या भागातील नागरिकांना तातडीने पीआर कार्ड द्यावेत, अशी मागणी त्यांनी केली. त्यावर आयुक्तांनी संबंधित प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यात आला असून तेथून निर्देश प्राप्त झाल्यानंतर पीआर कार्ड वाटपाची प्रक्रिया सुरू करण्यात येईल, असे स्पष्ट केले.

**अटलजींचे तैलचित्र, मोकाट जनावरे आणि स्वच्छतेवर प्रश्न**

भाजपचे नगरसेवक भास्कर दानवे यांनी भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांचे आर्किटेक्चरल व्ह्यू स्वरूपातील तैलचित्र सभागृहात लावण्याची मागणी केली. याशिवाय शहरातील मोकाट जनावरे किती पकडली, ती कोणत्या कोंडवाड्यात ठेवली, त्यावर किती खर्च झाला आणि देखरेख कोण करतो, याची माहिती मागितली.

स्वच्छतेवर कोट्यवधी रुपये खर्च होत असतानाही शहरात अस्वच्छतेच्या तक्रारी कायम असल्याचे सांगत संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून कामचुकार अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या वेतनात कपात करण्याची मागणीही



त्यांनी केली. तसेच कर्मचारी अपुरे असतील तर आउटसोर्सिंगद्वारे मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे, सिमेंट रस्त्यांमधील विजेचे खांब हटवावेत, दत्तनगर, कोठारीनगर, गायत्रीनगर परिसरातील पावसाच्या पाण्याचा निचरा करण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी मागणी केली.

**सोलार प्रकल्प, लिकेज स्कॅनर आणि जीएसटी अनुदान**

नगरसेवक अक्षय गोरंट्याल यांनी सोलार प्रकल्प, पाणीपुरवठा लाईनमधील गळती शोधण्यासाठी लिकेज स्कॅनर मशीन खरेदी, जीएसटी अनुदान आणि आकृतीबंध मंजुरीचा मुद्दा उपस्थित केला. तांत्रिक मान्यता आणि प्रशासकीय मान्यतेच्या प्रक्रियेवरून आयुक्तांनी अधिकाऱ्यांनाच प्रश्न विचारत, या प्रकरणात स्वतः लक्ष घालणार असल्याचे सांगितले. जीएसटी अनुदानाच्या बाबतीत इचलकरंजी महानगरपालिकेला मिळणाऱ्या अनुदानाच्या तुलनेत जालन्याला कमी निधी मिळत असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. त्यावर आयुक्तांनी स्पष्टीकरण दिले.

स्वच्छतागृहांची दुरवस्था, स्वच्छता वाहनांना जीपीएस बसविणे आणि सार्वजनिक स्वच्छतागृहांच्या सुधारणा याबाबतही चर्चा झाली. स्वच्छतागृहांची अवस्था समाधानकारक नसल्याची कबुली आयुक्तांनी दिली.

**अतिक्रमण आणि बीओटी प्रकल्पावर प्रश्न**

विरोधी पक्षनेते विरेंद्रप्रकाश धोका यांनी शहरातील अतिक्रमणे, बीओटी तत्त्वावरील जागा, कोंडवाड्याची जागा, जुन्या जालन्यातील महादेव मंदिर परिसरातील अस्वच्छता या विषयांवर प्रशासनाला धारेवर धरले. उपमहापौर राजेश राऊत यांनी कोंडवाड्याची जागा मनपाच्या ताब्यात घेण्याबाबत कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

**खेळाची मैदाने, मॅनहोल आणि स्ट्रक्चरल इंजिनिअर**

नगरसेवक दुर्गेश काठोटीवाले यांनी शहरातील खेळाची मैदाने कायम ठेवावीत, अतिक्रमित जागा ताब्यात घ्याव्यात, प्रणय हॉटेलमागील मनपाची जागा मुक्त करावी आणि मॅनहोलची समस्या सोडवावी, अशी मागणी केली. जिल्हा वार्षिक योजनेतून मॅनहोलच्या कामासाठी मंजुरी मिळाल्याचे सांगत एक-दोन दिवसांत निविदा प्रक्रिया सुरू होईल आणि पंधरा दिवसांत काम पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल, असे प्रशासनाने सांगितले.

**ड्रेनेज कामात कोट्यवधींच्या अपहाराचा आरोप**

अपक्ष नगरसेवक श्रीकांत पांगारकर यांनी शहरातील अंतर्गत ड्रेनेज कामात इस्टिमेटमध्ये असतानाही आवश्यक झाकणे (ढापे) बसविण्यात आली नसल्याचा आरोप करत हा कोट्यवधी रुपयांचा अपहार असल्याचा गंभीर आरोप सभागृहात केला.

**स्वच्छतेसाठी स्पर्धेचा प्रस्ताव**

नगरसेवक जगदीश भरतीया यांनी प्रत्येक नगरसेवकाला आपल्या प्रभागातील स्वच्छतेची जबाबदारी देऊन वार्ड स्पर्धा आयोजित करण्याचा प्रस्ताव मांडला. सर्वाधिक स्वच्छ प्रभागाला अतिरिक्त निधी देण्याची योजना राबवावी, अशी सूचना त्यांनी केली.

याचवेळी त्यांनी काही महिला नगरसेवकांच्या अनुपस्थितीत त्यांचे पती किंवा नातेवाईक प्रत्यक्ष काम पाहत असल्याचे विधान केले. या वक्तव्यामुळे सभागृहात नव्या चर्चेला तोंड फुटले.

**मनपा कार्यालयातील शिस्तीचा गंभीर प्रश्न**

नगरसेविका संध्या देठे यांनी मनपा कार्यालयातील कर्मचारी दारूच्या नशेत येणे, गुटखा, तंबाखू, सिगारेटचे सेवन करणे, काही विभागांमध्ये शिस्तीचा अभाव असल्याचा गंभीर मुद्दा उपस्थित केला. त्यावर आयुक्तांनी मनपा कार्यालयात गुटखा, तंबाखू, दारू आणि सिगारेटला पूर्ण बंदी घालण्यात येईल. नियमभंग करणाऱ्यांवर निलंबनासह कठोर कारवाई केली जाईल, असे स्पष्ट केले.

**भीम पार्कच्या मुद्द्यावरून सभागृहात गोंधळ**

नगरसेविका दर्शना खोतकर यांनी भीम पार्क-विपश्यना केंद्राचा विषय विषयपत्रिकेत का समाविष्ट करण्यात आला नाही, असा प्रश्न उपस्थित केला. यावर प्रशासनाकडून उत्तर दिले जात असतानाच शिवसेनेचे नगरसेवक आक्रमक झाले.


डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव असल्यामुळे मुद्दाम हा विषय टाळण्यात आला का? असा आरोप करण्यात आला. त्यानंतर वातावरण अधिकच तापले. एका नगरसेवकाने संतापाच्या भरात माईक फेकून दिला. भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) सदस्य आमनेसामने आले. संबंधित

### मनपा सभेत जगदीश भरतीयांच्या वक्तव्याने खळबळ; महिला नगरसेवकांऐवजी पती-नातेवाईक काम पाहतात असा अप्रत्यक्ष दावा; आता प्रशासन काय भूमिका घेणार, याकडे लक्ष

जालना शहर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत भाजपचे नगरसेवक जगदीश भरतीया यांनी केलेल्या वक्तव्यामुळे नव्या राजकीय आणि प्रशासकीय वादाला तोंड फुटण्याची चिन्हे दिसत आहेत. मनपा आयुक्तांनी नगरसेवकांच्या नातेवाईकांच्या कार्यालयीन हस्तक्षेपावर निर्बंध घालणारे परिपत्रक जारी केले असतानाच, भरतीया यांनी सभागृहात केलेल्या वक्तव्यातून अनेक महिला नगरसेवकांऐवजी त्यांचे पती, वडील किंवा इतर नातेवाईक प्रत्यक्ष क्षेत्रात काम पाहत असल्याचे सूचित केल्याने हा मुद्दा चर्चेचा विषय ठरला आहे.

सभागृहात बोलताना जगदीश भरतीया म्हणाले की, ''राज स्वामी स्वतः फिल्डवर जाऊन काम करतात. बांधकाम सभापती मनोज जोशी, रोहित खोडवे यांसारखे अनेक जण जनतेची कामे पाहतात. ९० टक्के ठिकाणी अशीच परिस्थिती आहे. त्यामुळे मनपा आयुक्तांनी काढलेल्या परिपत्रकावर पुन्हा विचार करण्याची गरज आहे.''

भरतीयांच्या या वक्तव्याने सभागृहात काही काळ वेगळीच चर्चा रंगली. कारण काही दिवसांपूर्वीच मनपा आयुक्तांनी नगरसेवकांच्या पती, पत्नी, मुलगा,



मुलगी किंवा इतर नातेवाईकांनी महापालिका मुख्यालय, प्रभाग कार्यालये किंवा विकासकामांमध्ये हस्तक्षेप करू नये, असे स्पष्ट निर्देश दिले होते. हा निर्णय प्रशासकीय पारदर्शकता आणि जबाबदारी सुनिश्चित करण्यासाठी घेतल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले होते.

अशा परिस्थितीत भरतीयांच्या वक्तव्याचा अर्थ नेमका काय, याबाबत आता प्रश्न उपस्थित होत आहेत. त्यांनी ''९० टक्के काम नातेवाईक पाहतात'' असे सूचित करून प्रत्यक्षात मनपा प्रशासनाच्या परिपत्रकातील वास्तवच सभागृहात मान्य केले का, अशी चर्चा सुरू झाली आहे. राजकीय वर्तुळात या वक्तव्याकडे अत्यंत गांभीर्याने पाहिले जात आहे. जर लोकप्रतिनिधींच्या जागी त्यांच्या नातेवाईकांकडून अधिकृत कामकाज किंवा प्रशासनाशी समन्वय साधला जात असेल, तर ते लोकशाही व्यवस्थेच्या दृष्टीने योग्य आहे का, असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे. मनपा आयुक्तांच्या परिपत्रकाचा उद्देशच लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांच्यातील अधिकृत संवाद केवळ निवडून आलेल्या नगरसेवकांपुरता मर्यादित ठेवण्याचा होता. अशा वेळी सभागृहातच नातेवाईक प्रत्यक्ष काम करत असल्याचे विधान समोर आल्याने महापौर आणि आयुक्त या वक्तव्याची दखल घेणार का, तसेच या संदर्भात कोणती प्रशासकीय भूमिका घेतली जाणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, या वक्तव्यावर सभागृहात कोणताही स्वतंत्र निर्णय झाला नसला, तरी त्यातून नगरसेवकांच्या नातेवाईकांच्या कथित हस्तक्षेपाचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. आगामी काळात या प्रकरणावर प्रशासन किंवा सत्ताधारी पक्षाकडून अधिकृत भूमिका स्पष्ट केली जाते का, याकडे राजकीय वर्तुळासह नागरिकांचेही लक्ष लागले आहे.

# शिवसेना उपनेते आ. अर्जुनराव खोतकर यांचा दिंडीत उत्स्फूर्त सहभाग

भक्तीरसात तल्लीन होऊन वारकऱ्यांसमवेत पायी चालत घेतला विठ्ठलनामाचा आनंद

**जालना - प्रतिनिधी**

आषाढी वारीच्या पवित्र पर्वानिमित्त शिवसेना उपनेते तथा जालना विधानसभा मतदारसंघाचे आमदार अर्जुनराव खोतकर यांनी विविध दिंड्यांना भेटी देत वारकरी संप्रदायाच्या भक्तिमय वातावरणात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कडवंची येथील ह.भ.प. अनिरुद्ध महाराज क्षिरसागर ,ह.भ.प. रमेश महाराज वाघ यांच्या दिंडीसह जालना जिल्ह्यातील अनेक दिड्यांत सहभागी होत त्यांनी वारकरी बांधवांसमवेत पायी चालत विठ्ठलनामाचा आनंद लुटला. तसेच जालना जिल्ह्यातील अनेक दिंड्यांना भेटी देऊन वारकरी मंडळींशी संवाद साधला.



यावेळी आ. खोतकर यांनी वारकरी बांधवांना टोपी व रुमालांचे वाटप करून त्यांच्या सेवेत सहभागी होत सामाजिक बांधिलकी जपली. दिंडीत सुरू असलेल्या भजन, कीर्तन, हरिनामाच्या गजरात ते तल्लीन झाले. टाळ-मृदंगाच्या निनादात आणि ''ज्ञानोबा-तुकाराम''च्या जयघोषात त्यांनी वारकऱ्यांसमवेत विठ्ठलभक्तीचा अनोखा

# आरोग्याच्या निर्देशांकामध्ये सुधारणा करा अन्यथा कार्यवाही होणार - जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

**जालना - प्रतिनिधी**

जिल्हास्तरीय कृतीदल समितीची सभा जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. नियमित लसीकरण, गोवर रुबेला निर्मुलन, राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम (एनक्युएएस), एच.पी.व्ही. लसीकरण, इत्यादी बाबत आढावा घेतांना काही निर्देशांकामध्ये काम कमी असल्याचे निदर्शनास आले तेव्हा जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी स्पष्ट निर्देश दिले की, आरोग्याच्या निर्देशांकामध्ये सुधारणा, गुणात्मक काम करा




अन्यथा सक्त कार्यवाही करण्यात येईल.

एच. पी. व्ही. लसीकरण जिल्ह्यात अत्यंत कमी असुन ते वाढविण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद डॉ. कृष्णकांत कनवारिया यांनी सर्व तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकिय अधिक्षक यांना दिले. एच.पी.व्ही. लसीकरण वाढविण्यासाठी शाळांना भेटी देवुन पालकांचे समुपदेशन करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. राष्ट्रीय कुष्ठरोग नियंत्रण कार्यक्रमाचा संपुर्ण आढावा व मार्गदर्शन सहाय्यक संचालक, आ.से. कुष्ठरोग डॉ. सुधाकर शेळके यांनी घेतला. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयश्री भुसारे यांनी पल्स पोलिओ, एच.पी.व्ही. लसीकरण, गोवर व रुबेला दुरीकरण मोहिम विषयी माहिती दिली.

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील यांनी महात्मा फुले जन आरोग्य योजनांचा आढावा घेऊन सांगितले की, ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र यांनी महात्मा फुले जन

पान १ व ४ वरुन...

## महापालिकेची सर्वसाधारण...

नगरसेवकाने माफी मागावी आणि त्याच्यावर कारवाई करावी, अशी मागणी भाजप सदस्यांनी केली. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याचे पाहून महापौरांनी सभा दहा मिनिटांसाठी तहकूब केली.

**आम्ही जनतेतून निवडून आलो**

सभा पुन्हा सुरू झाल्यानंतर फारुख तुंडीवाले यांनी सर्व सदस्यांना बोलण्याचा समान अधिकार मिळाला पाहिजे, असे सांगत, ''आम्ही जनतेतून निवडून आलो आहोत; बाहेरून परीक्षा देऊन आलो नाही,'' असे ठाम मत व्यक्त केले.

**पिंक टॉयलेट आणि हिरकणी कक्षाची मागणी**

नगरसेविका संगीता गोरंट्याल यांनी बाजारपेठांमध्ये महिलांसाठी मोबाईल पिंक टॉयलेट उभारावेत, मुख्य बाजारपेठेत हिरकणी कक्ष सुरू करावा, स्वच्छता ट्रॅक्टरच्या नियमित फेऱ्या व्हाव्यात आणि घंटागाड्यांच्या व्यवस्थापनात सुधारणा करावी, अशी मागणी केली.

**मनपाच्या वकिलांवरही टीका**

नगरसेवक महावीर ढक्का यांनी मनपाच्या वकिलांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. न्यायालयात प्रभावी बाजू मांडता येत नसेल तर सक्षम व तज्ज्ञ वकिलांची नियुक्ती करावी, अशी मागणी त्यांनी केली. जवाहर बाग, मुखर्जी गार्डन, बीओटी तत्त्वावरील जागा, थकीत भाडे वसुली आणि अतिक्रमण हटविण्याबाबतही त्यांनी प्रशासनाला धारेवर धरले.

घरात पाणी शिरणे, नाले तुंबणे, पथदिव्यांचा अभाव, पाणीपुरवठा, स्वच्छता, मोकाट जनावरे, अतिक्रमण, मॅनहोल, सार्वजनिक स्वच्छतागृहे, पीआर कार्ड, गळती, वीज, महिला सुविधा अशा शहराशी संबंधित जवळपास सर्वच महत्त्वाच्या विषयांवर सदस्यांनी प्रश्न उपस्थित केले.

सभेच्या शेवटी विषयपत्रिकेतील अनेक विषय ''मंजूर... मंजूर...'' अशा घोषणांमधून मंजूर करण्यात आले. काही विषयांवर सविस्तर चर्चा झाली, तर काही विषयांना विरोधी पक्षाने आक्षेप नोंदविला. अखेर राष्ट्रगीताने सर्वसाधारण सभेची सांगता झाली.

शहराच्या सर्वांगीण विकासाशी संबंधित तब्बल २८ विषय व प्रस्तावांवर सविस्तर चर्चा करून सभेने एकमताने मंजुरी दिली. पायाभूत सुविधा, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, करसवलत, पर्यावरण आणि मनपाचे उत्पन्न वाढविण्याशी संबंधित अनेक महत्त्वाचे निर्णय या सभेत घेण्यात आले.

**२५ प्रमुख चौकांचे होणार सुशोभीकरण**

जालना शहरातील प्रमुख २५ चौकांचे आधुनिक पद्धतीने सुशोभीकरण करण्याच्या प्रस्तावाला सभेने मंजुरी दिली. यामध्ये आकर्षक विद्युत रोषणाई, सौंदर्यवर्धक रचना, हरितीकरण तसेच वाहतूक व्यवस्थेला पूरक सुविधा विकसित करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यासोबतच शहरातील विविध नागरी सुविधा अधिक सक्षम करण्यासाठीही निर्णय घेण्यात आला.

**अमृतवन कचरा डेपोचे होणार स्थलांतर**

शहरातील स्वच्छतेच्या दृष्टीने महत्त्वाचा निर्णय घेत अमृतवन येथील कचरा डेपोतील कचरा सामनगाव येथील डंपिंग ग्राउंडवर मोठ्या वाहनांच्या माध्यमातून स्थलांतरित करण्यास मंजुरी देण्यात आली. तसेच शहरातील लहान-मोठ्या नाल्यांच्या नियमित साफसफाईसाठी नव्याने निविदा प्रक्रिया राबविण्याचाही निर्णय घेण्यात आला. त्यामुळे पावसाळ्यातील पाणी तुंबणे आणि अस्वच्छतेच्या समस्येवर मोठ्या प्रमाणात नियंत्रण मिळविण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**स्वातंत्र्यसैनिक आणि माजी सैनिकांना करसवलत**

देशासाठी योगदान दिलेल्या स्वातंत्र्यसैनिक, माजी सैनिक आणि पात्र मालमत्ताधारकांना मालमत्ता करामध्ये विशेष सवलत देण्याच्या प्रस्तावालाही मंजुरी देण्यात आली. कर विभागामार्फत हा लोकहिताचा निर्णय राबविण्यात येणार असून, संबंधितांना दिलासा मिळणार आहे.

**सफाई कामगारांना मोफत सदनिका**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रम साफल्य आवास योजनेंतर्गत पात्र सफाई कामगारांना मोफत सदनिका उपलब्ध करून देण्यास सभेने सकारात्मक मंजुरी दिली. शहराच्या स्वच्छतेसाठी अहोरात्र काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सामाजिक सुरक्षेच्या दृष्टीने हा महत्त्वाचा निर्णय मानला जात आहे.

**सोलर स्ट्रीट लाईटसाठी एनओसी**

आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत छत्रपती शिवाजी महाराज चौक ते गुरु बच्चन चौक या मार्गावर सौरऊर्जेवर आधारित स्ट्रीट लाईट बसविण्यासाठी आवश्यक असलेले ना हरकत प्रमाणपत्र (एनओसी) देण्यास सर्वसाधारण सभेने मंजुरी दिली. या निर्णयामुळे ऊर्जा बचतीबरोबरच पर्यावरणपूरक प्रकाशयोजना उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

**तत्वावर व्यावसायिक संकुले उभारणार**

महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी शहरातील मोकळ्या जागा आणि जुन्या शॉपिंग कॉम्प्लेक्सच्या ठिकाणी बांधा-वापरा-हस्तांतरित करा () तत्वावर आधुनिक व्यावसायिक संकुले उभारण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. तसेच छत्रपती संभाजी महाराज उद्यान चौपाटी परिसरात व्यावसायिकांना पुन्हा भाडेतत्त्वावर स्टॉल उपलब्ध करून देण्याबाबतही चर्चा करण्यात आली.

**आरोग्य आणि शिक्षण विभागाला चालना**

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियानांतर्गत मनपाच्या शिक्षण आणि आरोग्य विभागातील विविध विकासकामांना तातडीने प्रशासकीय मंजुरी देण्यात आली. त्यामुळे शैक्षणिक सुविधा आणि नागरी आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यावर भर दिला जाणार आहे. मानधन आणि कामकाज नियमावलीवर निर्णयशासन निर्णयानुसार महापौर आणि महानगरपालिकेच्या सदस्यांना मासिक मानधन अदा करण्यासाठी वित्तीय मंजुरी देण्यात आली. याचबरोबर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या कामकाजासाठी नवीन नियमावली तयार करण्यासाठी विशेष समिती स्थापन करण्याचा निर्णयही घेण्यात आला.

**विकासाला नवी गती मिळण्याची अपेक्षा**

सभेत मंजूर झालेल्या विविध विकासाभिमुख प्रस्तावांमुळे जालना शहरातील पायाभूत सुविधा, स्वच्छता, पर्यावरण, नागरी सेवा, आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर सुधारणा होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. शहराचा नियोजनबद्ध विकास, नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा आणि महानगरपालिकेचे आर्थिक बळकटीकरण या दृष्टीने ही सर्वसाधारण सभा महत्त्वपूर्ण ठरल्याचे प्रशासनाने सांगितले आहे.

## आरोग्याच्या...

आरोग्य योजनांचा लाभ रुग्णांना द्यावा. तसेच त्यांनी जन्म व मृत्यूचा आढावाही घेतला. रुग्णांना चांगली आरोग्य सेवा देवुन रेफर करणे शक्यतो टाळावे. आपल्या आरोग्य संस्था नियमित स्वच्छ असाव्यात. तालुका आरोग्य अधिकारी यांनी आपल्या पी.एच.सी.ला नियमित भेटी देऊन सर्व आरोग्य उपक्रमांचा आढावा घेऊन स्वच्छता पाहणी करण्याचे सांगितले.

यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ. जयश्री भुसारे जिल्हा शल्य चिकीत्सक, डॉ. राजेंद्र पाटील, गटविकास अधिकारी विनय पवार, कौशल पाटील, प्रगती इंगवले, लायन्स क्लबचे डॉ. गिरीश पाकणीकर, आरोग्य अधिकारी डॉ. एस. झेड गवारे व कर्मचारी उपस्थित होते. डॉ. जगदीश बनसोडे, डॉ. श्रीकांत देसाई डॉ. एन.जी.पवार, वैद्यकिय अधिक्षक, तालुका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## शिवसेना...

अनुभव घेतला. यावेळी त्यांनी पंढरीनाथ चरणी प्रार्थना करत राज्यात चांगला पाऊस पडावा, शेतकऱ्यांवरील नैसर्गिक संकटे दूर व्हावीत, शेतीला भरभराट यावी आणि सर्वसामान्य जनतेच्या जीवनात सुख-समृद्धी नांदावी, असे साकडे श्री विठ्ठल-रुक्मिणी चरणी घातले.

आ. खोतकर यांच्या दिंडी भेटीमुळे वारकरी बांधवांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. अनेक वारकरी, दिंडी प्रमुख आणि नागरिकांनी त्यांचे पुष्पहार व फेटा घालून स्वागत केले. वारकऱ्यांशी साधलेला आत्मीय संवाद आणि त्यांच्यासोबत घालविलेला वेळ हा अत्यंत समाधानकारक व मनःशांती देणारा अनुभव असल्याची भावना आ. खोतकर यांनी व्यक्त केली.

यावेळी संपर्क प्रमुख पंडितराव भुतेकर, शहरप्रमुख विष्णू पाचफुले, कृष्णा खोतकर यांच

## दृश्यम स्टाईलने...

ॲनालायझर) कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे तपासणीसाठी पाठविण्यात आला. पोलीस अधीक्षक तेजबीरसिंग संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या पाठपुराव्यामुळे अवघ्या २४ तासांत डीएनए अहवाल प्राप्त झाला. या अहवालात संबंधित मृतदेह हा ऋषीकेश पवार यांचाच असून संबंधित महिला त्यांची जैविक माता असल्याचे स्पष्ट झाले.

खुनाचा गुन्हा दाखल; आरोपी ताब्यात

डीएनए अहवालानंतर पोलिस शिपाई वसंत भगवानराव धस यांच्या फिर्यादीवरून तालुका जालना पोलीस ठाण्यात आरोपी अविनाश वाघमारे याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०३(१) व २३८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीला ताब्यात घेण्यात आले असून या प्रकरणाचा पुढील तपास कदीम जालना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जनार्धन शेवाळे यांच्याकडे विशेष तपास अधिकारी म्हणून सोपविण्यात आला आहे.

विशेष तपास पथकाची उल्लेखनीय कामगिरी

ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक तेजबीरसिंग संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. तपासात कदीम जालना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जनार्धन शेवाळे, तालुका जालना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष साबळे तसेच सचिन चौधरी, सदा राठोड, कैलास जायभाये, मतीन शेख, संदीप चव्हाण, इधान खान आणि कृष्णा चक्षाण आदी पोलिस कर्मचाऱ्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

या कौशल्यपूर्ण तपासामुळे जवळपास वर्षभर गूढ राहिलेल्या खुनाच्या प्रकरणाचा उलगडा झाला असून, पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न करूनही पोलिसांनी गुप्त माहिती, तांत्रिक तपास आणि डीएनए चाचणीच्या आधारे आरोपीला कायद्याच्या कचाट्यात आणण्यात यश मिळवले आहे.

## कला, वारसा ...

भिडे, बृन्हमुंबई महानगर पालिकेच्या अतिरिक्त आयुक्त प्राजक्ता लवंगारे,आदी उपस्थित होते.

**थोडक्यात काळा घोडा परिसर सुशोभीकरण..**

दक्षिण मुंबईतील काळा घोडा परिसर युनेस्कोच्या 'व्हिक्टोरियन गॉथिक अँड आर्ट डेको आसम्बल ऑफ मुंबई' या जागतिक वारसा स्थळाला लागूनच असल्यामुळे मुंबईकरांना हेरिटेज वॉकचा आनंद घेता यावा, यासाठी पाच रस्त्यांचे सुशोभीकरण करण्यात आले आहे. यामध्ये परिसरातील साईबाबा मार्ग, रोप वॉक लेन, डॉ. व्ही. बी. गांधी मार्ग, फोर्ब्स स्ट्रीट, रुदरफोर्ड स्ट्रीट व बी. भरुचा मार्ग या रस्त्यांच्या समावेश आहे. येथे संग्रहालये, कला दालने व ऐतिहासिक वारसा असलेल्या इमारती आहेत. दरवर्षी भरविला जाणारा काळा घोडा कला महोत्सव या परिसराची सांस्कृतिक ओळख आहे.

बी. भरूचा मार्गावरील चौकात 'प्लाझा' साकारण्यात आला असून करडा आणि काळा ग्रॅनाईट तसेच बेसॉल्ट फरशीचा यासाठी वापर करण्यात आला आहे.

या प्लाझाजवळ टेबल-खुर्चीवर बसून मुंबईकर, पर्यटक या परिसराचा, येथील स्वादिष्ट पदार्थांचा आनंद घेवू शकणार आहेत. आकर्षक स्ट्रीट आर्ट भित्तिचित्रे आणि सार्वजनिक बसण्याच्या खास जागा देऊन अधिक पादचारी-स्नेही मार्ग बनविण्याता आला आहे.

## मूर्ती दरवाजाच्या...

असल्याने नागरिकांमध्ये नाराजी आणि चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

नागरिकांचे मत आहे की, दर्गाह दरवाजाची दुरुस्ती, रंगरंगोटी, चुन्याचे काम आणि संवर्धन करण्याऐवजी त्याचे पाडकाम केल्यास जालना शहराच्या ऐतिहासिक वारशाचा एक महत्त्वाचा ठेवा नष्ट होईल. त्यामुळे या ऐतिहासिक वास्तूचे जतन करून तिचे संवर्धन करण्यात यावे, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## सामाजिक व शैक्षणिक...

यांचा सपत्नीक सन्मान व सत्कार केला. सेवानिवृत्तीनंतरही समाजाप्रती असलेली बांधिलकी जपत श्री. बनसोडे यांनी आपल्या जन्मगाव पिरपिंपळगाव येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेला कृतज्ञतेच्या भावनेतून ४३ इंची ऑनराईड स्मार्ट टीव्ही व चार्जिंग स्पीकर प्रणाली भेट दिली. तसेच ज्या मनपा प्राथमिक शाळा, रंगारखिडकी येथून ते सेवानिवृत्त झाले त्या शाळेला वॉटर प्युरिफायर भेट देऊन विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचेही वाटप केले.शिक्षण, समाजप्रबोधन, संघटनात्मक नेतृत्व आणि समाजसेवा या क्षेत्रांतील त्यांच्या प्रदीर्घ योगदानाबद्दल विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत असून, त्यांच्या पुढील सामाजिक कार्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## १५ जुलैपासून...

येते. त्यामुळे सर्व शेतकरी बांधवांनी १५ जुलैपासून सुरू होणाऱ्या ई-पीक पाहणी मोहिमेत सहभागी होऊन आपल्या शेतातील पिकांची अचूक नोंद करून घ्यावी, असे आवाहन भास्कर आबा दानवे यांनी केले आहे.

## आदर्श भगिनी...

मानाचे महिला मंडळ आहे, ज्याची स्वतःची स्वतंत्र वास्तू आहे. मंडळाची हीच ऐतिहासिक गरिमा आणि परंपरा आम्ही पुढेही कायम ठेवू. आगामी काळात महिलांसाठी केवळ मनोरंजनात्मकच नव्हे, तर समाजोपयोगी, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक अशा विविध दर्जेदार कार्यक्रमांचे आयोजन केले जाईल. मंडळाची सदस्य संख्या वाढवून अधिकाधिक महिलांना या मंचाशी जोडण्याचा आमचा मानस आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही नवरात्रोत्सवाचे नऊ दिवस अविरत चालणारे विविध कार्यक्रम तसेच १५ ऑगस्ट व २६ जानेवारी रोजीचे ध्वजारोहण नेहमीच्या उत्साहात पार पाडले जाईल, अशी ग्वाही देखील त्यांनी दिली.

सूत्रसंचालन जयश्री लड्डा आणि मंजु श्रीमाली यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार नवनियुक्त सचिव संगीता मुंदडा यांनी मानले.

## शालेय क्रीडा....

डॉ.राहुलजी म्हस्के यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की,या वर्षी च्या सर्व स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सर्वोत्परी सहकार्य आमचे महाविद्यालय करीन, विविध क्रीडा स्पर्धेसाठी खेळाचे मैदान ही आम्ही उपलब्ध करून देऊ.१० ऑगस्ट रोजी फुटबॉल स्पर्धा जि.प.प्रशाला जाफराबाद येथे तर ११ऑगस्ट ते १३ऑगस्ट रोजी बुद्धीबळ,कॅरम,योगा,या स्पर्धा ज्ञानसागर विद्यालय सिपोरा अंभोरा येथे होणार आहेत.व्हॉलीबॉल,कुस्ती, कबड्डी,खो-खो स्पर्धा सिद्धार्थ महाविद्यालय जाफराबाद व न्यू हायस्कूल विद्यालय जाफराबाद येथे संपन्न होणार आहेत.तसेच क्रीकेट स्पर्धा बी एस एन एल टॉवर तर मैदानी स्पर्धा जिल्हा परिषद जाफराबाद येथे,क्रॉसकंन्टरी स्पर्धा रेपाळा रोड येथे संपन्न होणार आहेत.या स्पर्धा यशस्वी करण्याचे आवाहन तालुका संयोजक श्री एकनाथ सुरुसे व प्रा.वाहेद पटेल यांनी केले आहे. या नियोजनाची बैठक सिद्धार्थ महाविद्यालय जाफराबाद येथे संपन्न झाली .या बैठकीत सिद्धार्थ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रो डॉ सुनील मेढे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा विनोद हिवराळे, जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीमती लता लोंढे, श्रीमती आरती चिल्लारे, राज्य क्रीडा मार्गदर्शक सिद्धार्थ कदम तालुका क्रीडा संयोजक श्री. एकनाथ सुरुसे, प्रा. वाहेद पटेल, प्रा. उदय वझरकर, प्रा. शिवाजी वैद्य, महाविद्यालयाचे प्रसिद्धी प्रमुख प्रा. अनिल वैद्य, मुख्याध्यापक रमेश मुरकुटे, जाफ्राबाद तालुक्यातील क्रीडा शिक्षक पत्रकार बंधुं प्रा.पांडुरंग राऊत, नगरसेवक व क्रीडा शिक्षक मुजीब सर,दिपक खरात,निकम सर व जाफराबाद तालुक्यातील क्रीडा शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या बैठकीचे संचलन सिद्धार्थ महाविद्यालयातील प्राध्यापक अनिल वैद्य यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.उदय वझरकर यांनी केले.या बैठकीचीसांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

## १५ जुलैपासून...

आमदार बबनराव लोणीकर यांनी शेवटी स्पष्ट केले की, ''ई-पीक पाहणी ही केवळ औपचारिक प्रक्रिया नसून शेतकऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण करणारी आणि भविष्यातील शासकीय मदतीचा पाया मजबूत करणारी महत्त्वाची यंत्रणा आहे. त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याने १५ जुलैपासून सुरू होणाऱ्या या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवून आपल्या पिकांची नोंदणी वेळेत पूर्ण करावी असे म्हटले आहे.


### सडक परिवहन और राजमार्ग मंत्रालय
### अधिसुचना
### नई दिल्ली १६ जूलै २०२६

का.आ..... (अ) केंद्रीय सरकार, राष्ट्रीय राजमार्ग अधिनियम १९५६ (१९५६ का ४८) (जिसे इसमे इसके पश्चात उक्त अधिनियम कहा गया है) कि धारा ३-क की उपधारा (१) व्दारा प्रदत्त शक्तीयोका प्रयोग करते हुए, यह समाधान हो जाने के पश्चात कि महाराष्ट्र राज्य के जालना जिल्हे मे NH-548-C के कि.मी.५१.२६२ से कि.मी. १०१.७४ (सब डिव्हीजनल ऑफीसर परतूर) तक के भूखंड के निर्माण (चौडीकरण/पेव्ड शोल्डर सहित २-लेन/४लेन का बनाना आदी) अनुरक्षण, प्रबंधन और प्रचालन के लोक प्रयोजन के लिए वह भूमि अपेक्षित है जिसका संक्षिप्त वर्णन निचे अनुसूची मे दिया गया है, ऐसी भूमि का अर्जन करने के आपणे आशय कि घोषणा करती है।

कोई भी व्यक्ती, जो उक्त भूमि मे हितसंबंध है, उक्त अधिनियम की धारा ३-ग की उपधारा (१) के अधीन पुर्वोक्त प्रयोजन के लिए ऐसी भूमि के उपयोग पर राजपत्र मे इस अधिसुचना के प्रकाशन की तारीख से इक्कीस दिन के भीतर आपण आपति पकट कर सकेगा।

ऐसी प्रत्येक आपत्ती सक्षम प्राधिकारी, अर्थात सब डिव्हीजनल ऑफीसर एवं लॅन्ड एक्वीजीशन ऑफीसर परतूर को लिखीत रुपये प्रस्तूत कि जाएगी और उसमे उसके आधार अधिकथित किए जाएंगे और सक्षम प्राधिकारी आपत्तीकर्ता को व्यक्तिगत रुपमे या किसी विधीक पेशेवर व्दारा सुने जाने का अवसर देगा और ऐसी आपत्तियो कि सुनवाई के पश्चात तथा ऐसी और जॉच करणे के पश्चात, यदि कोई हो, जिसे सक्षम प्राधिकारी आवश्यक समझे, आदेश व्दारा या तो आपत्तियो को अनुज्ञात कर सकेगा या अननूज्ञाम कर सकेगा

१ उक्त अधिनियम कि धारा ३-ग की उपधारा (२) के अधीन सक्षम प्राधिकारी व्दारा किया गया कोई भी आदेश अंतीम होगा। इस अधिसुचनाके अंतर्गत आनेवाली भूमि के रेखांकन और अंन्य ब्यौरे सक्षम प्राधिकारी के उक्त कार्यालय में उपलब्ध है आर उसका हितबध्द व्यक्तीयो व्दारा निरीक्षण किया जा सकाता है।

महाराष्ट्र राज्य के जालना जिल्हे मे NH-548-C के कि.मी. के कि.मी.५१.२६२ से कि.मी. १०१.७४ (सब डिव्हीजनल ऑफीसर परतूर) के लिए अर्जन की जाने वाली संरचना रहित अथवा संरचा संहित भूमिका संक्षिप्त विवरण

राज्य का नांव : महाराष्ट्र     जिल्हे का नांम : जालना

| क्रमीक संख्या | सर्वेक्षण संख्या | भमि का प्रकार | भूमि की प्रकृती | भूमि का क्षेत्रफल (स्थानिय इकाई) | भूमि का क्षेत्रफल हेक्टीयर |
|---|---|---|---|---|---|
| तालुका : परतुर | | | | | |
| गांव का नाम: सावंगी गंगा किणारा ता. परतूर | | | | | |
| १. | २७ पैकी | निजी | एग्रीकल्चर | ०.३३.५२००००० | ०.३३५२०००००० |

**कार्यकारी अभियंता**
**महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ**
**शिबीर कार्यालय जालना**

**उपविभागीय अधिकारी**
**परतूर जि. जालना**

### TRANSPORT AND HIGHWARYS NOTIFICATION.
### New Delhi, Dated 16/07/2026

S.O. (E) In exercise of the powers conferred by sub section (1) of section 3-A of the National High way Act, 1956 (48 of 1956) herein after referred to as the said Act) the Central Government after being satisfied that for the public purpose, the land, the brief description of which is given in the scheduled below, is required for building (Widening/ two lane with pavd shoulder/four laning etc) maintenance, management and operation of NH-548-C in the stretch of land, from Km.51.262 to Km101.74 (Sub Divisional Officer Partur in the District Jalna in the State of Maharashtra, hereby declares its intention to acquire such land.

Any person interested in the said land may, within twenty one days from the date of publication of this notification in the official Gazette, object to the use of such land for the foreside purpose under sub section (1) of Section (3C) of the said Act.

Every such objection shall be made to the Competent Authority, namely Sub Divisional Officer & Land acquisition Officer, Partur District Jalna in writing and shall set out the grounds thereof and the Competent Authority shall give the objector an opportunity of being heard, either in person or by a legal practitioner, and may, after hearing all such objections and after making such further enquiry, if any, as the Competent Authority thinks necessary, by order, either allow or disallow the objections.

Any order made by the Competent Authority under sub section (2) of section 3C of the said Act. The land plans and other details of the land to be acquired under their notification are available and can be inspected by the interested person at the aforesaid office of the Competent Authority. SCHEDULE

Brief description of the land to be acquired with or without structures falling NH-548-Cin the stretch of land from Km. 51.262 to Km101.74 (Sub Divisional Officer Partur) in the district Jalna in the Stata of Maharashtra.

STATE: MAHARASHTRA     DISTRICT: JALNA

| Sr.No. | Survya/Plot Number | Type of Land | Nature of Land | Area in Local Unit | Area in Hectare |
|---|---|---|---|---|---|
| Taluka Partur | | | | | |
| Village: Sawangi Ganga Kinara | | | | | |
| 1. | 27 | Private | Agriculture | 0.33.5200000 | 0.3352000000 |

**Executive Engineer**
**National Highway**
**Authority**

**Sub Divisional**
**Officer**
**Partur Dist. Jalna**

# आषाढस्य प्रथम दिवसे...

आषाढाचे आगमन हे भारतीय संस्कृतीत, विशेषतः महाराष्ट्रात, निसर्गाच्या नवचैतन्याचे आणि भक्तीचे प्रतीक मानले जाते. हिंदू पंचांगानुसार आषाढ हा वर्षातील चौथा महिना असून तो मुख्यत्वे पावसाळ्याच्या आणि आषाढी वारीच्या आगमनाची चाहूल देतो.आषाढ आगमनाचे महत्त्व आणि वैशिष्ट्ये निसर्गाचे रूप: आषाढाच्या सुरुवातीला आकाशात काळे ढग जमा होतात आणि आषाढघनाचे (पहिल्या पावसाचे) आगमन होते. त्यामुळे कोरडी पडलेली धरणी हिरवीगार होऊ लागते.वारकऱ्यांची पाऊले: या महिन्याच्या सुरुवातीलाच महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून पंढरपूरकडे जाणाऱ्या पालख्यांचे आणि दिंड्यांचे प्रस्थान होते. विठू माऊलीच्या ओढीने संपूर्ण महाराष्ट्र भक्तीरसात न्हाऊन निघतो.शेतीची कामे: शेतकऱ्यांसाठी हा महिना अत्यंत महत्त्वाचा असतो. आषाढात पडणाऱ्या पावसामुळे शेतात पेरणी आणि लावणीच्या कामांना वेग येतो.

आषाढाचे आगमन हे भारतीय संस्कृतीत, विशेषतः महाराष्ट्रात, निसर्गाच्या नवचैतन्याचे आणि भक्तीचे प्रतीक मानले जाते.

आषाढ आगमनाचे महत्त्व आणि वैशिष्ट्ये म्हणजे

आषाढाच्या सुरुवातीला आकाशात काळे ढग जमा होतात आणि आषाढघनाचे (पहिल्या पावसाचे) आगमन होते. त्यामुळे कोरडी पडलेली धरणी हिरवीगार होऊ लागते.

या महिन्याच्या सुरुवातीलाच महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून पंढरपूरकडे जाणाऱ्या पालख्यांचे आणि दिंड्यांचे प्रस्थान होते. विठू माऊलीच्या ओढीने संपूर्ण महाराष्ट्र भक्तीरसात न्हाऊन निघतो.

शेतकऱ्यांसाठी हा महिना अत्यंत महत्त्वाचा असतो. आषाढात पडणाऱ्या पावसामुळे शेतात पेरणी आणि लावणीच्या कामांना वेग येतो.

आषाढ शुद्ध प्रतिपदेला महाकवी कालिदास दिन म्हणून साजरा केला जातो.. तसेच या महिन्यात येणारी आषाढी एकादशी (देवशयनी एकादशी) आणि गुरुपौर्णिमा हे मोठे सण साजरे केले जातात.

आषाढाचे आगमन म्हणजे निसर्गाच्या नवचैतन्याचा, शेतीच्या लगबगीचा आणि भक्तीच्या अथांग सागराचा त्रिवेणी संगम होय. उन्हाळ्याच्या काहिलीने व्याकुळ झालेल्या धरणीला शांत करतो. हा केवळ ऋतू बदलाचा काळ नसून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनाचा पाया आहे.

**निसर्गाचे अलौकिक रूप आणि सृजनाचा सोहळा-**

आषाढ महिना सुरू होताच आकाशात काळ्याकुट्ट मेघांची गर्दी होते. मेघ मल्हाराच्या सुरांमध्ये पावसाचे आगमन होते.

धरेचे रूप पालटते- रखरखीत उन्हात होरपळलेली जमीन पहिल्या पावसाने सुखावते. मातीचा सुगंध चोहोकडे पसरतो.

हिरवे शालू- डोंगर-दऱ्या हिरव्यागार गवताने नटतात. धबधबे प्रवाहित होतात.

काव्यात्मक वातावरण- हा महिना कवी मनाला भुरळ घालणारा आहे. महाकवी कालिदासांनी याच महिन्यातील पहिल्या मेघाला दूत बनवून आपले अमर काव्य मेघदूत रचले होते. म्हणूनच आषाढ शुद्ध प्रतिपदेला कालिदास दिन साजरा केला जातो.

शेतकरी आणि कृषी संस्कृतीची लगबग

शेतकऱ्यांसाठी आषाढ हा अत्यंत महत्त्वाचा आणि कष्टाचा महिना असतो.


पेरणीची घाई- मृग नक्षत्रात झालेल्या पावसावर शेतकरी खरीप पिकांचे नियोजन करतात. आषाढ लागताच सोयाबीन, कापूस, तूर आणि बाजरीच्या पेरण्या पूर्ण केल्या जातात.

भाताची लावणी- कोकण आणि मावळ भागात या महिन्यात मुसळधार पावसात भात लावणीची कामे वेगाने सुरू होतात. चिखलात उभे राहून गाणी गात चाललेली ही लावणी कृषी संस्कृतीचे सौंदर्य दाखवते.

वारी आणि भक्तीचा मळवट

महाराष्ट्राच्या संदर्भात आषाढ आणि पंढरपूरची वारी हे समीकरण वेगळे करताच येत नाही.

भक्तीचा महापूर- संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम महाराजांच्या पालख्यांच्या प्रस्थानाने आषाढाची सुरुवात होते. लाखो वारकरी ''ज्ञानोबा-तुकाराम'' च्या गजरात शेकडो किलोमीटरची पदयात्रा करतात.




आषाढी एकादशी- आषाढ शुद्ध एकादशीला (देवशयनी एकादशी) वारी पंढरपुरात पोहोचते. चंद्रभागेच्या वाळवंटात अवघा विठ्ठलमय झालेला समाज एकत्र येतो. हा सोहळा समता आणि बंधुभावाचे जगातील सर्वात मोठे उदाहरण आहे.

धार्मिक सण आणि चातुर्मासाची सुरुवात-

धार्मिक दृष्टिकोनातून आषाढ हा संथ, संयमी आणि व्रतवैकल्यांचा महिना मानला जातो.

चातुर्मास प्रारंभ- आषाढी एकादशीपासून हिंदू धर्मात चातुर्मासाची (चार पवित्र महिने) सुरुवात होते. या काळात अनेक लोक सात्त्विक आहार आणि उपवास करतात.

गुरुपौर्णिमा- आषाढी पौर्णिमेला गुरुपौर्णिमा किंवा व्यास पौर्णिमा म्हणतात. आपल्या जीवनाला आकार देणाऱ्या गुरूंबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस असतो.

दीपपूजन- आषाढ अमावस्येला गटारी म्हणून काही भागात ओळखले जात असले, तरी पारंपरिकदृष्ट्या या दिवशी घरातील सर्व दिव्यांची पूजा करून दीप अमावस्या साजरी केली जाते.

थोडक्यात सांगायचे तर, आषाढाचे आगमन हे सृष्टीचे पुनरुज्जीवन करणारे आहे. तो एकाच वेळी शेतकऱ्याच्या डोळ्यात आशेचा किरण, वारकऱ्याच्या मनात भक्तीचा भाव आणि कवीच्या कल्पनेत सौंदर्याची पालवी फुटवणारा महिना आहे. हा ऋतू आपल्याला निसर्गाच्या जवळ जाण्याचा आणि कृतज्ञ राहण्याचा संदेश देतो.

आषाढाचे आगमन: संत आणि विचारवंतांच्या दृष्टीकोनातून एक आत्मिक प्रवास

आषाढाचे आगमन ही केवळ एक ऋतू वैज्ञानिक घटना नाही, तर ती भारतीय, विशेषतः महाराष्ट्रीय जनमानसाच्या आत्मिक आणि बौद्धिक मंथनाची नांदी आहे. या महिन्याकडे जेव्हा आपण संत आणि आधुनिक विचारवंतांच्या नजरेतून पाहतो, तेव्हा त्याचे विलोभनीय रूप समोर येते. आषाढ हा निसर्गाच्या पातळीवर जेवढा भौतिक आहे, तेवढाच संतांच्या पातळीवर तो आध्यात्मिक आणि विचारवंतांच्या पातळीवर सामाजिक क्रांतीचा पाया आहे.

१. संतांची अनुभूती:- विरहाकडून मिलनवेधाकडे

संतांनी आषाढातील काळ्या ढगांना आणि पावसाला भक्तीचे माध्यम बनवले. त्यांच्या मते, उन्हाळ्याने व्याकुळ झालेली धरणी म्हणजे ईश्वराच्या विरहाने तडफडणारा जीव आणि आषाढाचा पाऊस म्हणजे ईश्वरी कृपेचा वर्षाव.

संत तुकाराम महाराज आणि आषाढ:- तुकोबांच्या गाथेत आषाढाचे संदर्भ मानवी मनाच्या आर्ततेशी जोडलेले आहेत. ते म्हणतात,

''आषाढी कार्तिकी विसरू नका मज। सांगतसे गूज विठोबाचे।।''

तुकोबांसाठी आषाढ हा केवळ एक महिना नव्हता, तर तो विठ्ठल भेटीचा काळ होता. जशी चातक पक्षी पावसाची वाट पाहतो, तशीच जीवात्म्याची विठ्ठल माऊलीसाठी झालेली व्याकुळता संतांनी आषाढाच्या रूपात मांडली.

संत ज्ञानेश्वर माउलींची भक्तीची वृष्टी: - माउलींनी ज्ञानेश्वरीत निसर्गाच्या रूपकांचा अप्रतिम वापर केला आहे. आषाढात जेव्हा ढग बरसतात, तेव्हा ज्ञानेश्वर महाराजांना त्यात ज्ञानोबा-तुकाराम या नामाची आणि ब्रह्मांडाच्या अद्वैताची अनुभूती येते. वारीच्या रूपाने लाखो पावले जेव्हा पंढरीकडे निघतात, तेव्हा तो ज्ञानेश्वरांच्या भूतदया आणि पसायदानातील वैश्विक कल्याणाचा जिवंत सोहळा ठरतो.

२. आधुनिक विचारवंतांचा दृष्टिकोन:- समता आणि समाजशास्त्रीय मंथन

आधुनिक विचारवंत आणि समाजशास्त्रज्ञांनी आषाढाच्या आगमनाला आणि वारीला एका वेगळ्या, प्रगत दृष्टीकोनातून पाहिले आहे.

इरावती कर्वे आणि संस्कृतीचा उगम: थोर विचारवंत इरावती कर्वे यांनी वारीचा अभ्यास करताना असे म्हटले आहे की, ''वारी हा महाराष्ट्राचा सांस्कृतिक आणि भावनिक सांधा आहे.'' आषाढात जेव्हा संपूर्ण महाराष्ट्र शेतीची कामे सांभाळून किंवा वारीत सहभागी होऊन एका सूत्रात बांधला जातो, तेव्हा तो समाजातील जात-पात विसरून एकसंध होतो. हा सामाजिक लोकशाहीचा सर्वात मोठा आविष्कार आहे.

डॉ. रामचंद्र देखणे यांचे कृषी आणि भक्तीचे अद्वैत: विचारवंत डॉ. रामचंद्र देखणे यांच्या मते, आषाढ हा कृषी संस्कृती आणि श्रम संस्कृतीचे संमेलन आहे. एका हाताने विठ्ठलाची पताका धरणारा वारकरी दुसऱ्या हाताने शेतात नांगर धरतो. संतांनी कधीही कर्मापासून पळ काढायला शिकवले नाही, तर कांदा, मुळा, भाजी, अवघी विठाई माझी म्हणत श्रमालाच देव मानले.

३. महाकवी कालिदास आणि वैचारिक सौंदर्यशास्त्र

आषाढाचा विचार कालिदासांशिवाय अपूर्ण आहे. आषाढाच्या पहिल्या दिवशी (आषाढस्य प्रथम दिवसे) त्यांनी पाहिलेला मेघ हा केवळ पाऊस पाडणारा ढग नव्हता, तर तो एका मानवी हृदयातील भावना दुसऱ्या हृदयापर्यंत पोहोचवणारा वैचारिक दूत होता. कालिदासांनी निसर्गाचे मानवीकरण केले. त्यांच्या मते, निसर्ग हा जड नसून तो मानवासारखाच सुख-दुःखाच्या संवेदना जाणणारा आहे. हा विचार आजच्या काळात पर्यावरणवादी तत्त्वज्ञान म्हणून ओळखला जातो.

४. आषाढाचे मानसशास्त्रीय आणि वैचारिक फलित

संत आणि विचारवंतांच्या या संदर्भांमधून आषाढ महिन्याचे तीन प्रमुख वैचारिक पैलू समोर येतात:

अहंकाराचा लोप: वारीच्या वाटेवर श्रीमंत-गरीब, उच्च-नीच हा भेद संपतो. संतांच्या भाषेत हा अहंभाव संपवण्याचा काळ आहे.

आशेचे पुनरुज्जीवन: आषाढात पडणारा पाऊस माणसाला नैराश्यातून बाहेर काढून आशेचा किरण दाखवतो. ''पेरते व्हा'' हा निसर्गाचा संदेश मानवी मनाला सतत कार्यमग्न राहण्याची प्रेरणा देतो.

अंतर्मुखता : चातुर्मासाच्या सुरुवातीमुळे हा काळ स्वतः च्या दोषांचे विश्लेषण करण्याचा आणि बौद्धिक प्रगतीचा मानला जातो.

थोडक्यात सांगायचे तर, आषाढाचे आगमन हे संतांसाठी भक्तीचा उत्सव आहे, शेतकऱ्यासाठी कर्माचा यज्ञ आहे आणि विचारवंतांसाठी सामाजिक समतेचे व्यासपीठ आहे. हा महिना आपल्याला हेच शिकवतो की, जीवनात भौतिक समृद्धी (पाऊस आणि पीक) जितकी महत्त्वाची आहे, तितकीच आत्मिक आणि वैचारिक समृद्धी (भक्ती आणि ज्ञान) देखील गरजेची आहे.

आषाढ महिन्याचे आगमन हे एकेकाळी मानवी जीवन, निसर्ग आणि अध्यात्माला एकाच सूत्रात बांधणारे माध्यम होते. मात्र, आजच्या २१ व्या शतकातील गतिमान, तंत्रज्ञानस्नेही आणि नागरीकरण झालेल्या आधुनिक काळाशी जेव्हा आपण आषाढाची तुलना करतो, तेव्हा या संकल्पनेत आणि मानवाच्या दृष्टिकोनात खूप मोठा वैचारिक बदल झाल्याचे दिसून येते. हा बदल केवळ ऋतू बदलण्यापुरता मर्यादित नसून, तो आपल्या जीवनमूल्यांचा आणि मानसिकतेचा बदल आहे.

१. निसर्गाशी असलेले नाते: तादात्म्य विरुद्ध उपभोग

✻ पारंपरिक दृष्टिकोन: पूर्वी आषाढाचे आगमन म्हणजे सृजनाचा सोहळा असायचा. महाकवी कालिदासांचा मेघदूत निसर्गाशी असलेल्या मानवी संवादाचे प्रतीक होता. पाऊस पडणे ही एक दैवी आणि कृतज्ञतापूर्वक स्वीकारण्याची गोष्ट मानली जात असे.

✻ आधुनिक वास्तव: आजच्या ग्लोबल वॉर्मिंग आणि प्रदूषणाच्या काळात आषाढाचे आगमन अनिश्चित झाले आहे. आधुनिक माणसासाठी पाऊस हा सौंदर्याचा अनुभव कमी आणि ट्रॅफिक जाम, वॉटर लॉगिंग (पाणी साचणे) किंवा लोकल ट्रेन उशिरा चालणे यांसारख्या पायाभूत सुविधांच्या समस्यांशी जोडलेला विषय बनला आहे. निसर्गाशी असलेले आत्मिक नाते संपून आता ते केवळ एक हवामानाचा अंदाज ( ) या बातमीपुरते मर्यादित राहिले आहे.

२. कृषी संस्कृती: श्रमाची पूजा विरुद्ध यांत्रिकीकरण आणि संकट.

✻ पारंपरिक दृष्टिकोन: संतांनी आणि पूर्वजांनी आषाढाला श्रमाचा महिना मानले. चिखलात पाय रोवून केलेली भात लावणी आणि पेरणी हा आनंदोत्सव असायचा, ज्यातून सामूहिक जीवनपद्धती दृढ होत असे.

आधुनिक वास्तव: आज शेतीचे मोठ्या प्रमाणावर यांत्रिकीकरण झाले आहे. ट्रॅक्टर आणि आधुनिक उपकरणांमुळे श्रम कमी झाले असले, तरी शेतकऱ्यासमोरील आव्हाने वाढली आहेत. हवामानातील बदलामुळे आषाढात कधी कोरडा दुष्काळ तर कधी अतिवृष्टी (ढगफुटी) होते. पूर्वी आषाढाकडे आशेने पाहणारा शेतकरी आता बाजारातील खतांचे भाव, पिकाला मिळणारा हमीभाव आणि कर्जाच्या ओझ्याखाली दबलेला दिसतो. त्यामुळे आषाढाचे आगमन आता आनंदाऐवजी चिंतेचे ढग घेऊन येते.

३. पंढरपूरची वारी: भक्तीचा मळवट विरुद्ध डिजिटल वारी आणि पर्यटन.

पारंपरिक दृष्टिकोन: वारी हा प्रामुख्याने अहंकाराचे विसर्जन करून, चालत जाऊन विठ्ठलाशी एकरूप होण्याचा आणि सामाजिक समता अनुभवण्याचा मार्ग होता.

✻आधुनिक वास्तव: आधुनिक काळात वारीचे स्वरूप कमालीचे बदलले आहे. तंत्रज्ञानाच्या साहाय्याने आता डिजिटल वारी किंवा लाईव्ह दर्शन उपलब्ध झाले आहे. तरुण पिढी वारीकडे एक हेरिटेज वॉक ( ) किंवा सोशल मीडिया रील बनवण्याचे माध्यम म्हणूनही पाहू लागली आहे. अर्थात, यामुळे वारी जागतिक पातळीवर पोहोचली असली, तरी त्यातील पारंपरिक शांतता आणि अंतर्मुखता कुठेतरी आधुनिकतेच्या गदारोळात हरवत चालली आहे का, हा मोठा वैचारिक प्रश्न आहे.

४. चातुर्मास आणि सण: आत्मपरीक्षण विरुद्ध व्यावसायिकता

✻ पारंपरिक दृष्टिकोन: आषाढापासून सुरू होणाऱ्या चातुर्मासाचा मुख्य उद्देश संयम, सात्त्विक आहार आणि अंतर्मुख होऊन स्वतःचे आत्मपरीक्षण करणे हा होता.

✻ आधुनिक वास्तव: आजच्या चंगळवादी () संस्कृतीत प्रत्येक सणाचे बाजारीकरण झाले आहे. आषाढ संपताना येणाऱ्या सणांना आता कॉर्पोरेट ऑफर्स, हॉलिडे पॅकेजेस आणि हॉटेल्समधील पार्ट्यांचे स्वरूप आले आहे. गटारी अमावस्या किंवा दीपपूजन दीप आमवश्या यांसारख्या सणांमधील पवित्रता आणि कौटुंबिक जवळीक कमी होऊन, त्याला पार्ट्यांचे आणि सोशल मीडिया स्टेटसचे स्वरूप आले आहे.

आधुनिक काळ आपल्याला वेग, सोयी आणि जागतिक संपर्क देऊ शकला; परंतु निसर्गाशी आणि स्वतःच्या अंतर्मनाशी असलेले नाते मात्र आषाढाच्या पावसासारखे धूसर होत गेले. आज गरज आहे ती आषाढाच्या मूळ तत्त्वज्ञानाकडे परत जाण्याची. तंत्रज्ञान आधुनिक असले तरी मानवी मन आणि निसर्गाचा समतोल राखणे गरजेचे आहे. आषाढाचे आगमन आपल्याला पुन्हा एकदा थांबायला, विचार करायला आणि निसर्गाच्या तालावर जगायला शिकवू शकते, जर आपण त्याकडे केवळ एक कॅलेंडरमधील महिना म्हणून न पाहता एक जीवनपद्धती म्हणून पाहिले तरच हे शक्य आहे.



**दिलीप देशपांडे.**
**जामनेर. जिल्हा जळगाव.**
**८९९९५६६९१७**

---

## डॉ. निलेश पगारे यांच्या 'मुर्दों की नगरी'चे १५ जुलैला प्रकाशन

### पूर्वनोंदणी १३ जूलै तर ०१ ऑगस्ट पासून आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत पुस्तक उपलब्ध असणार

**जालना - प्रतिनिधी**



संघर्षमय वाटेवरून वाटचाल करत साहित्याच्या क्षेत्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारे युवा लेखक डॉ. निलेश किशोरराव पगारे यांची नवी कलाकृती 'मुर्दों की नगरी' लवकरच वाचकांच्या भेटीला येत आहे. हे पुस्तक सध्या साहित्य वर्तुळात मोठ्या चर्चेचा विषय ठरले असून, १५, २० आणि २२ जुलै रोजी अनुक्रमे हरियाणा (पलवल), दिल्ली आणि पुणे येथे या पुस्तकाचे भव्य प्रकाशन सोहळे पार पडणार आहेत. ३० भागांमध्ये गुंफलेले हे पुस्तक कोणत्या सामाजिक किंवा वैयक्तिक सत्यावर प्रकाश टाकणार, याबद्दल वाचकांमध्ये मोठी उत्सुकता आहे. पुस्तकाचे अनावरण होताच त्याच्या गूढ शीर्षकाने आणि प्रभावी पोस्टरने साहित्यप्रेमींचे लक्ष वेधून घेतले आहे. डॉ. पगारे यांनी आपल्या लेखणीच्या जोरावर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर स्वतःचे स्थान निर्माण केले आहे. त्यांच्या या पुस्तकाला भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयांतर्गत असलेल्या राजा राममोहन रॉय नॅशनल एजन्सीने अधिकृत मान्यता दिली असून, त्याला आय.एस.बी.एन क्रमांक (९७८-९३-७८८०-१५२-५) प्राप्त झाला आहे. याशिवाय प्रकाशकांनी या पुस्तकास संदर्भ क्रमांक १९४६ दिला आहे. कशी कराल नोंदणी?

पुस्तकाच्या पूर्वनोंदणीला १३ जुलैपासून सुरुवात झाली आहे. इच्छुक वाचक ४१४१. या ईमेलवर किंवा या इंस्टाग्राम हँडलद्वारे पुस्तकासाठी आपली नोंदणी करू शकता,येत्या ०१ ऑगस्टपासून हे पुस्तक आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतही उपलब्ध होणार आहे.

---

## शाळाबाह्य मुलांच्या सर्वेक्षणास स्थगिती द्या, अन्यथा थेट बहिष्कार; शेख अब्दुल रहीम

### थेट राज्याचे शिक्षण संचालक प्राथमिक तसेच राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांना निवेदन सादर!

### पुन्हा शिक्षक वर्गाबाहेर! मग विद्यार्थ्यांना शिकवणार कोण?

**छत्रपती संभाजीनगर – प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण संचालनालयाने १५ जुलै ते ३० जुलै २०२६ या कालावधीत राज्यभरात जाहीर केलेल्या शाळाबाह्य, अनियमित व स्थलांतरित बालकांच्या सर्वेक्षणाला राज्यभरातून तीव्र विरोध सुरू झाला आहे. सध्या राज्यात निवडणूक आयोगाचा विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम () सुरू असल्याने आणि शिक्षकांवर अशैक्षणिक कामांचा प्रचंड ताण असल्याने, या सर्वेक्षणाला तात्काळ स्थगिती द्यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटन आणि हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन यांच्या वतीने करण्यात आली आहे. मागण्या मान्य न झाल्यास या सर्वेक्षणावर संपूर्ण बहिष्कार टाकण्याचा इशारा संघटनांनी दिला आहे. या संदर्भात संघटनेचे राज्य प्रवक्ते आणि संस्थापक अध्यक्ष शेख अब्दुल रहीम यांनी शिक्षण संचालक (प्राथमिक) यांना थेट निवेदन पाठवून तीव्र आक्षेप नोंदवला आहे.

**विरोधाची प्रमुख कारणे आणि शिक्षकांचे प्रश्न:**




निवडणूक आयोगाच्या आदेशांचे उघड उल्लंघन: सध्या संपूर्ण राज्यात निवडणूक आयोगाच्या वतीने मतदार यादी पुनरीक्षणाचे काम अत्यंत गांभीर्याने सुरू आहे. मुख्य निवडणूक आयोगाने ३ जुलै २०२६ च्या पत्राद्वारे या कालावधीत शिक्षकांना इतर कोणत्याही सर्वेक्षणास किंवा अशैक्षणिक कामास लावण्यास स्पष्ट बंदी घातली आहे. शिक्षण विभागाचा हा निर्णय निवडणूक आयोगाच्या निर्देशांचा अवमान करणारा आहे.

शिक्षकांवर शारीरिक व मानसिक ताण: राज्यातील बहुतांश शिक्षक आधीच बी.एल.ओ. () व निवडणूक विषयक इतर कामांमध्ये व्यस्त आहेत. त्यातच आता शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण लादल्यामुळे शिक्षकांमध्ये तीव्र असंतोष आहे. एकाच वेळी दोन्ही कामे करणे अशक्यप्राय आहे.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेचे नुकसान: नवीन शैक्षणिक सत्र सुरू झाले असून प्रत्यक्ष अध्यापनाचे काम वेगाने सुरू आहे. शिक्षकांना सातत्याने शाळाबाह्य कामात गुंतवून ठेवल्यास विद्यार्थ्यांच्या नियमित अभ्यासाचे अतोनात नुकसान होईल, ज्याची संपूर्ण जबाबदारी शिक्षण विभागाची असेल.

पावसाळ्यातील तांत्रिक व भौगोलिक अडचणी: सध्या राज्यात पावसाळ्याचे दिवस असल्याने ग्रामीण, दुर्गम आणि स्थलांतरित भागात जाऊन गृहभेट देणे आणि सर्वेक्षण करणे अत्यंत जोखमीचे व अडचणीचे ठरत आहे.

**तातडीने स्थगिती द्या, अन्यथा थेट बहिष्कार**

**''शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे हा हेतू चांगला असला, तरी सध्याची परिस्थिती आणि निवडणूक आयोगाचे कडक निर्बंध पाहता शिक्षण विभागाने हट्ट बाजूला ठेवावा. १५ जुलैपासून सुरू होणारे हे सर्वेक्षण तात्काळ रद्द करावे किंवा त्यास स्थगिती द्यावी. तसे न झाल्यास आमची संघटना या सर्वेक्षणावर पूर्णपणे बहिष्कार टाकेल.''**

**शेख अब्दुल रहीम**
**(राज्य प्रवक्ता, महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटन व अध्यक्ष, हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन)**

# दृश्यम स्टाईलने मित्राचा खून करून मृतदेह नदीत फेकला; वर्षभरानंतर गुन्ह्याची उकल

### कर्जाच्या पैशांच्या वादातून हत्या; डीएनए तपासणी, गुप्त माहिती आणि कौशल्यपूर्ण तपासाच्या आधारे आरोपी जेरबंद

**जालना । प्रतिनिधी**

जवळपास वर्षभरापूर्वी घडलेल्या आणि बेपत्ता व्यक्तीच्या प्रकरणामागील धक्कादायक खुनाचा उलगडा करण्यात कदीम जालना पोलिसांना मोठे यश आले आहे. चित्रपट दृश्यम च्या धर्तीवर पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न करत मित्राचा खून करून मृतदेह दुधना नदीत फेकल्याचा प्रकार पोलिस तपासात उघडकीस आला आहे. या प्रकरणी आरोपी अविनाश वाघमारे (रा. माळीपुरा, जालना) याला पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कदीम जालना पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या एका गुन्ह्याच्या तपासादरम्यान पोलीस निरीक्षक जनार्धन शेवाळे यांना गुप्त बातमीदारामार्फत महत्त्वाची माहिती मिळाली. त्यानुसार आरोपी अविनाश वाघमारे याने सप्टेंबर २०२५ मध्ये त्याचा मित्र ऋषीकेश पवार (रा. योगेशनगर, जालना) याचा खून केल्याची माहिती समोर आली.

या माहितीची खातरजमा केली असता, ऋषीकेश पवार हा २२ सप्टेंबर २०२५ पासून बेपत्ता असल्याची नोंद तालुका जालना पोलीस ठाण्यात मनुष्य बेपत्ता म्हणून असल्याचे अभिलेखातून स्पष्ट झाले. त्यानंतर पोलीस निरीक्षक जनार्धन शेवाळे आणि त्यांच्या तपास पथकाने आरोपीची कसून चौकशी केली. कौशल्यपूर्ण तपासादरम्यान आरोपीने अखेर गुन्ह्याची कबुली दिली.

एक लाख रुपयांच्या व्यवहारातून झाला वाद तपासात आरोपीने सांगितले की, त्याने मयत ऋषीकेश पवार याच्याकडून सुमारे एक लाख रुपये उधार घेतले होते. पैशांची वारंवार मागणी होत असल्याने दोघांमध्ये वाद सुरू होता. आरोपीकडे पैसे नसल्याने तो टाळाटाळ करत होता. अखेर ''आज तुला पार्टी देतो, नंतर पैसे देतो,'' असे सांगून त्याने ऋषीकेशला मोटारसायकलवरून बठाण गावाच्या हद्दीतील स्वतःच्या शेतात नेले. तेथे दोघांनी बिअर पिल्यानंतर पैशांच्या विषयावर पुन्हा वाद झाला. ''मला पैशांसाठी शिवीगाळ का केली?'' असा जाब विचारत आरोपीने प्रथम हाताने गळा आवळला आणि त्यानंतर नायलॉनच्या रुमालाने गळा आवळून ऋषीकेशची हत्या केली.

स्कॉर्पिओत मृतदेह टाकून दुधना नदीत फेकला खून केल्यानंतर आरोपीने मृतदेह स्कॉर्पिओ वाहनात टाकला आणि दुधना नदीच्या पात्रात फेकून पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर ऋषीकेश बेपत्ता असल्याचेच चित्र निर्माण झाले आणि जवळपास वर्षभर हा गुन्हा उघडकीस आला नव्हता.

डीएनए तपासणीने उघड झाले सत्य आरोपीच्या कबुलीनंतर पोलिसांनी दुधना नदीलगतच्या अंबड, आष्टी, परतूर, मोजपुरी आणि तालुका जालना पोलीस ठाण्यांशी संपर्क साधून सप्टेंबर-ऑक्टोबर २०२५ मध्ये सापडलेल्या बेवारस मृतदेहांची माहिती मागविली. त्यावेळी अंबड पोलीस ठाण्यात अशाच एका अज्ञात मृतदेहाची नोंद असल्याचे समोर आले.

या मृतदेहाचा डीएनए नमुना जतन करण्यात आला होता. त्यानंतर ऋषीकेश पवार यांच्या आईचा डीएनए नमुना घेऊन तो रासायनिक विश्लेषक (केमिकल

# १५ जुलैपासून ई-पीक पाहणीला प्रारंभ

### प्रत्येक शेतकऱ्याने पीक नोंदणी करून शासनाच्या योजनांचा लाभ घ्यावा - आ. लोणीकर

**परतूर । प्रतिनिधी**

राज्यात खरीप हंगाम २०२६-२७ साठी १५ जुलैपासून ई-पीक पाहणी मोहिमेला प्रारंभ होत असून, राज्यातील प्रत्येक शेतकऱ्याने आपल्या शेतातील पिकांची अचूक नोंद करून घ्यावी, असे आवाहन माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर यांनी केले आहे. शासनाने यंदा ई-पीक पाहणी प्रक्रियेत बदल करून गावागावात पीक पाहणी सहाय्यक नियुक्त करण्याचा निर्णय घेतला असून, ही प्रक्रिया अधिक वेगवान, पारदर्शक आणि शेतकरीहिताची ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले. आमदार लोणीकर म्हणाले की, गेल्या काही वर्षांत नैसर्गिक आपत्ती, अतिवृष्टी, दुष्काळ, अवकाळी पाऊस, गारपीट आणि इतर संकटांमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीत शासनाकडून मिळणारी नुकसानभरपाई, पीकविमा, विविध कृषी अनुदाने आणि इतर योजनांचा लाभ मिळवण्यासाठी ई-पीक पाहणीतील अचूक नोंदणी अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे कोणत्याही शेतकऱ्याने ही प्रक्रिया हलक्यात घेऊ नये. यंदा शेतकऱ्यांच्या मदतीसाठी गावपातळीवर नियुक्त करण्यात आलेले पीक पाहणी सहाय्यक थेट शेतात जाऊन मोबाईल ॲपच्या माध्यमातून पिकांची नोंद करणार आहेत. त्यानंतर ग्राम महसूल अधिकारी या नोंदींची पडताळणी करतील. त्यामुळे चुकीची माहिती नोंदविली जाण्याची शक्यता कमी होणार असून, शासनाकडे अचूक माहिती उपलब्ध होईल.लोणीकर यांनी शेतकऱ्यांना आवाहन करताना सांगितले की, पीक पाहणी सहाय्यक गावात आल्यानंतर त्यांना पूर्ण सहकार्य करावे. शेतातील सर्व पिकांची योग्य माहिती द्यावी, जेणेकरून भविष्यात कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी अडचण निर्माण होणार नाही. चुकीची अथवा अपूर्ण माहिती दिल्यास शेतकऱ्यांनाच नुकसान सहन करावे लागू शकते, याचीही त्यांनी जाणीव करून दिली. ते पुढे म्हणाले की, महसूल, कृषी आणि संबंधित विभागांनीही ई-पीक पाहणी मोहीम प्रभावीपणे राबवावी. प्रत्येक गावात शंभर टक्के पीक नोंदणी पूर्ण करण्यासाठी नियोजन करावे. शेतकऱ्यांना कोणतीही अडचण आल्यास ती तत्काळ सोडविण्याची व्यवस्था करावी, तसेच गावपातळीवर जनजागृती करून या मोहिमेचा उद्देश प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत पोहोचवावा.

# कला, वारसा आणि आधुनिक सुविधांचा काळा घोडा परिसरात संगम - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई - प्रतिनिधी**



मुंबईचे वैभव असलेल्या काळाघोडा परिसरातील रस्त्यांचे अत्यंत उत्तमरित्या सुशोभीकरण करण्यात आले आहे. सुशोभीकरण कामातून कलात्मक व तत्कालीन वास्तुकलेशी समरसता जपण्यात आली आहे. कला, वारसा आणि आधुनिक सुविधांचा झालेल्या संगमातून या परिसराचे नवे रूप नागरिकांना अनुभवता येणार आहे, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे हस्ते काळा घोडा आर्ट एवेन्यू सौंदर्यीकरण कामांचे लोकार्पण काळा घोडा प्लाझा, बी. भरूचा मार्ग येथे आयोजित कार्यक्रमात करण्यात आले. नागरिकांसाठी असलेली ही व्यवस्था हेरिटेज वॉक आहे. येथील पाथ वे आणि प्रत्येक जागेला कलात्मक स्पर्श करण्यात आला आहे. अत्यंत सुंदर व्यवस्था आहे त्याच शिस्तीमध्ये सुरू राहावी, यासाठी येथे येणारे नागरिक, येथील व्यावसायिक यांनी दक्षता घ्यावी, अशी अपेक्षाही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली. यावेळी व्यासपीठावर उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, विधानसभा अध्यक्ष ॲड राहुल नार्वेकर, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड आशिष शेलार, महापौर रितू तावडे, स्थायी समिती अध्यक्ष प्रभाकर शिंदे, मनपा विरोधी पक्ष नेत्या किशोरी पेडणेकर, सभागृह नेते गणेश खणकर, नगरसेवक हर्षिता नार्वेकर, बृन्हमुंबई महानगर पालिका आयुक्त अश्विनी

# मूर्ती दरवाजाच्या पाडकामानंतर आता महानगरपालिकेची नजर दर्गाह दरवाजावर महापालिका आयुक्त अंजली मिश्रा यांनी जारी केली सूचना

### उपायुक्त त्रिंबक कांबळे यांनी पाडकाम कारवाईदरम्यान बंदोबस्तासाठी जालना जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे मागणी

**जालना - प्रतिनिधी**

जालना महानगरपालिकेचे उपायुक्त त्रिंबक कांबळे यांनी १५ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजता होणाऱ्या पाडकाम कारवाईच्या अनुषंगाने महानगरपालिका पत्र क्रमांक ११७/२०२६ द्वारे जालना जिल्हा पोलीस अधीक्षकांना अधिकृत पत्र पाठविले आहे. या पत्राद्वारे कादराबाद येथील दर्गाह दरवाजावरील पाडकाम कारवाईदरम्यान कायदा व सुव्यवस्था तसेच शांतता राखण्यासाठी आवश्यक पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. यापूर्वी, १० जुलै २०२६ रोजी जालना महानगरपालिकेच्या आयुक्त अंजली मिश्रा यांनी अधिकृत पत्र क्रमांक ४८/२०२६ द्वारे सहायक आयुक्त



आणि स्वच्छता निरीक्षकांना कादराबाद येथील दर्गाह दरवाजाचे पाडकाम करण्याचे निर्देश दिले होते.

महापालिका आयुक्त अंजली मिश्रा आणि उपायुक्त त्रिंबक कांबळे यांची पत्रे जारी झाल्यानंतर जालना शहरातील ऐतिहासिक वास्तू असलेल्या दर्गाह दरवाजाच्या पाडकामाच्या निर्णयाबाबत नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, दर्गाह हजरत जानुल्ला शाह रुही इस्टेट, कादराबाद (जालना) येथील खुद्दाम समितीचे उपाध्यक्ष परवेज आलम यांनी समितीच्या वतीने महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाकडे निवेदन सादर करून जालना महानगरपालिकेने दर्गाह दरवाजावरील पाडकाम कारवाई तात्काळ थांबवावी, अशी मागणी केली आहे.

इतिहासानुसार, आलमगीरच्या काळात हजरत जानुल्ला शाह रुही यांच्या आदेशानुसार नाहर खान यांनी इ.स. १६५३ ते १६५८ या कालावधीत कादराबाद परिसराला तटबंदी घातली. त्यावेळी दर्गाह दरवाजा, पाणी दरवाजा, मूर्ती दरवाजा, हैदराबाद दरवाजा, लष्कर दरवाजा आणि दिल्ली दरवाजा यांची उभारणी करण्यात आली होती.

गेल्या साडेतीन शतकांपासून हे दरवाजे जालना जिल्ह्याच्या समृद्ध इतिहासाचे साक्षीदार राहिले असून त्यांनी शहराच्या वैभवात मोलाची भर घातली आहे. मात्र, कालांतराने दिल्ली दरवाजा, लष्कर दरवाजा आणि हैदराबाद दरवाजा यांचे अवशेष नष्ट झाले आहेत. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, सुमारे तीन वर्षांपूर्वी मूर्ती दरवाजाचे पाडकाम करण्यात आले होते. आता दर्गाह दरवाजावरही पाडकामाची कारवाई होणार

# मातंग समाजातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**मुंबई - प्रतिनिधी**

मुंबई शहर व उपनगर जिल्ह्यातील मातंग समाजातील मांग, मातंग, मिनी मादीग, मादींग, दानखणी मांग, मांग महाशी, मदारी, राधेमांग, मांग गारुडी, मांग गारोडी, मादगी, मादिगा या १२ पोटजातीतील २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात शिक्षण घेतलेल्या व २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात उत्तीर्ण झालेल्या इयत्ता १० वी, १२ वी. पदवी, पदव्युत्तर, वैद्यकीय व अभियांत्रिकी विद्यार्थ्यांकडून सरासरी ६०% पेक्षा जास्त गुण असलेल्या ''साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे शिष्यवृत्ती'' करीता अर्ज मागविण्यात येत आहेत. अभ्यासक्रमामध्ये विशेष प्राविण्याने गुणवत्ता मिळवंन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी जातीचा दाखला, रेशनकार्ड, आधार कार्ड, शाळेचा दाखला, मार्कशीट, २ फोटो, पुढील वर्गात प्रवेश घेतल्याचा पुरावा इ.सह दोन प्रतीत आपल्या पुर्ण पत्यासह व भ्रमणध्वनी क्रमांकासह साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या), मुंबई गृहनिर्माणभवन, कलानगर, तळमजला, रुम नं. ३३, बांद्रा (पू), मुंबई-४०००५१ या पत्त्यावर २७ जुलै, २०२६ पर्यंत अर्ज करावा, असे जिल्हा व्यवस्थापक, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या), जिल्हा कार्यालय मुंबई शहर-उपनगर यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

# सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल मुख्याध्यापक शांतीलाल बनसोडे यांचा सेवागौरव

**जालना -प्रतिनिधी**

जालना महानगरपालिका प्राथमिक शाळा, रंगारखिडकी येथील मुख्याध्यापक श्री. शांतीलाल काशीनाथ बनसोडे हे दिनांक ३० जून २०२६ रोजी प्रदीर्घ व आदर्श सेवेनंतर सेवानिवृत्त झाले.शिक्षण क्षेत्रातील कर्तव्यनिष्ठ सेवेसोबतच त्यांनी सामाजिक, साहित्यिक व जनजागृतीच्या क्षेत्रातही उल्लेखनीय कार्य केले आहे. ते राष्ट्रमाता महाराणी अहिल्यादेवी होळकर स्मारक समिती, अंबड चौफुली, जालनाचे सचिव, मौर्य क्रांती संघ, महाराष्ट्र राज्यचे कार्यकारिणी सदस्य, मराठवाडा साहित्य परिषद, छत्रपती संभाजीनगर जिल्हा शाखा, जालनाचे संचालक, तसेच



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर बहुजन व्याख्यानमाला, जालनाचे संस्थापक सचिव म्हणून कार्यरत आहेत.यापूर्वी त्यांनी *महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ (न.प. शाखा, जालना)चे अध्यक्ष, इंडियन बहुजन टिचर्स असोसिएशन, महाराष्ट्र राज्यचे कार्यकारिणी सदस्य, जय मल्हार कर्मचारी संघटना, जालनाचे जिल्हाध्यक्ष, अहिल्यादेवी होळकर प्रतिष्ठान, मुंबई (जालना शाखा)चे जिल्हाध्यक्ष तसेच जालना आरक्षण कृती समिती मोर्चा (२०१४) चे सचिव म्हणूनही उल्लेखनीय जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. ''सामाजिक बदल हेच आमचे यश'' हे ब्रीदवाक्य समोर ठेवून त्यांनी सातत्याने समाजप्रबोधन व जनहिताची कामे केली.त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व संघटनात्मक कार्याचा गौरव करण्यासाठी शाळेतील शिक्षक, पालक, शालेय व्यवस्थापन समिती, जालना शहर महानगरपालीका, महाराणी अहिल्यादेवी होळकर स्मारक समिती, शिक्षक मित्र मंडळ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर बहुजन व्याख्यानमाला समिती, मराठवाडा साहित्य परिषद शाखा जालना, व्यापारी मित्र मंडळ, धनगर समाज आरक्षण संघर्ष समिती, जिजामाता अकॅडमी, प्लॅनेट फिटनेस क्लब, मॉर्निंग योगा ग्रुप तसेच विविध सामाजिक संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त भव्य सेवागौरव सोहळ्याचे आयोजन करून श्री. बनसोडे व सौ. बनसोडे

# १५ जुलैपासून ई-पीक पाहणी मोहिमेला प्रारंभ

### शेतकऱ्यांनी अचूक पीक नोंदणी करावी - भास्कर दानवे

**जालना - प्रतिनिधी**

महसूल विभाग, महाराष्ट्र शासनामार्फत खरीप हंगाम २०२६-२७ साठी १५ जुलैपासून ई-पीक पाहणी मोहिमेला प्रारंभ होत आहे. राज्यातील प्रत्येक शेतकऱ्याने आपल्या शेतातील पिकांची अचूक नोंद करून शासनाच्या या महत्त्वपूर्ण उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी केले आहे.

यंदा शासनाने ई-पीक पाहणी प्रक्रियेत महत्त्वपूर्ण बदल करत गावागावात ''पीक पाहणी सहाय्यक'' नियुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे पीक नोंदणीची प्रक्रिया अधिक वेगवान, पारदर्शक आणि शेतकरी हिताची ठरणार आहे.



ई-पीक पाहणीमुळे शेतातील पिकांची अधिकृत नोंद शासनाकडे उपलब्ध होते. त्यामुळे पीक विमा, नैसर्गिक आपत्तीतील नुकसानभरपाई, विविध कृषी योजना, अनुदाने, पीक कर्ज तसेच इतर शासकीय लाभ मिळविण्याची प्रक्रिया अधिक सुलभ होते. याशिवाय राज्यातील पिकांची अचूक माहिती उपलब्ध झाल्याने कृषी नियोजन अधिक प्रभावीपणे करता

# शालेय क्रीडा स्पर्धेत जास्तीत जास्त संघांनी सहभाग नोंदवावा - प्रा. डॉ.राहुलजी म्हस्के

**दत्ता देशमुख**

जाफराबाद तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेचे वेळापत्रक जाहीर झाले असून या स्पर्धा १०ऑगस्ट पासून प्रारंभ होत असुन २२ सप्टेंबर पर्यंत चालणार आहेत. आज दिनांक १३ जुलै रोजी सिद्धार्थ महाविद्यालयात जाफ्राबाद येथे शालेय क्रीडा शिक्षकांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे ०१ व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय जालना यांच्या संयुक्त विद्यमाने सिद्धार्थ कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय जाफराबाद येथे




१३ जुलै रोजी क्रीडा शिक्षकांच्या बैठकीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.या बैठकीत जाफराबाद तालुक्यातील शालेय क्रीडा स्पर्धेचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून स्पर्धेला १० ऑगस्ट पासून प्रारंभ होत आहे.या बैठकीच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव डॉ. राहुलजी म्हस्के हे होते तर जिल्हा क्रीडा अधिकारी मा.नरेंद्र पवार प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.जिल्हा क्रीडा अधिकारी मा.नरेद्र पवार यांनी आपल्या भाषणात म्हणाले जाफराबाद तालुक्यातील सर्व माध्यमिक, उच्चमाध्यमिक व विविध महाविद्यालयात या क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात येईल.या स्पर्धा सुरळीत व चांगल्या वातावरणात पार पाडण्यासाठी सर्व शिक्षकांनी सहकार्य करावे.व जास्तीत जास्त संघांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन त्यांनी केले.दर वर्षी ४९ खेळाचे आयोजन करण्यात येते, त्यापैकी जाफराबाद तालुक्यात १० खेळ प्रकाराचे आयोजन करण्यात येणार आहे.या स्पर्धेत भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना निर्गम उतारा, आधारकार्ड आसने आवश्यक आहे.कसलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सर्व शिक्षकांनी सहकार्य करावे.या बैठकीचे अध्यक्ष संस्थेचे सन्माननीय सचिव

# आदर्श भगिनी मंडळाच्या अध्यक्षपदी निर्मला साबू, सचिवपदी संगीता मुंदडा

**जालना - प्रतिनिधी**

येथील अग्रगण्य आणि महिलांच्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या आदर्श भगिनी मंडळाची कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली असून, अध्यक्षपदी निर्मला साबू, तर सचिवपदी संगीता मुंदडा यांची निवड झाली आहे.

मंडळाच्या मावळत्या उपाध्यक्ष मंगला भंडारी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. व्यासपीठावर मावळत्या अध्यक्ष विजया लाळे, वरिष्ठ सदस्या निर्मला करवा, चंद्रकला भक्कड आणि शकुंतला मंत्री यांची




उपस्थिती. मंगला भंडारी यांनी मागच्या वर्षाचा तर मावळत्या कोषाध्यक्ष शोभा तोतला यांनी दोन वर्षाचा अहवाल सादर केला. त्यानंतर जाहीर करण्यात आलेल्या नवीन कार्यकारिणीत कोषाध्यक्षपदी सुनीता आर. मंत्री, उपाध्यक्षपदी सुषमा पायगव्हाणे व विणा साबू तर सहसचिवपदी शोभा तोतला यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या संपूर्ण निवडणूक प्रक्रियेचे संचालन जयश्री लड्ढा आणि मंजू श्रीमाली यांनी केले. नवीन कार्यकारिणीचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. या बैठकीला मंडळाच्या ५० हून अधिक महिला सदस्या उपस्थित होत्या. मावळत्या अध्यक्षांनी आपल्या कार्यकाळात लाभलेल्या सहकार्याबद्दल सर्वांचे आभार मानले.

गरिमा कायम ठेवत सामाजिक कार्याचा विस्तार करणार: निर्मला साबू : अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर बोलताना नूतन अध्यक्षा निर्मला साबू यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. त्या म्हणाल्या की, आदर्श भगिनी मंडळ हे जालन्यातील एक अत्यंत जुने आणि

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६**, E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.